MHKO100004092008

**नियमीत दिवाणी दावा क्र. ९२/२००८**

रामू धडाम – म.वा. वगैरे.
//विरुध्द//
भिमराव पाटील – म.वा. वगैरे.

**निशाणी क्र.११५ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला "पुरावा बंद" चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. वादींतर्फे प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.११८ येथे म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा फिल्ड होऊन स्वतंत्र कब्जा देवविणेबाबत व कायम मनाईनासाठी दाखल केलेला आहे. सदर प्रकरण हे सन २००८ साली दाखल असुन ते प्रतिवादींच्या पुराव्याकरीता ब-याच कालावधीपासुन प्रलंबीत असुन देखील प्रतिवादींनी पुरावा दाखल न केल्यामुळे दिनांक ०७/१२/२०२३ रोजी प्रतिवादी यांचा पुरावा बंद करण्यात आला. प्रस्तुत अर्जाअन्वये प्रतिवादी यांनी असे कारण नमुद केले आहे की, प्रस्तुत काम मे. न्यायालयात दिनांक ०७/१२/२०२३ रोजी प्रतिवादीतर्फे साक्षीदार यांचा नि.८८ प्रमाणे उलटतपास घेणेवर नमले होते. परंतु, प्रस्तुत कामातील पक्षकार यांना पुकारले असता ते न्यायालयात हजर नसलेने त्याचेविरुध्द पुरावा नाही असा आदेश पारित झालेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी हे आजारी असलेने न्यायालयात पुकारले असता साक्ष देणेसाठी हजर राहू शकले नाहीत असे कारण नमुद केलेले आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणात झालेला विलंब पाहता सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता पक्षकारांमध्ये पुन्हा नवीन प्रकरण दाखल होऊन गुंतागुंत वाढण्याची शक्यता असल्याने प्रतिवादींना संधी देणे संयुक्तीक वाटते. प्रस्तुत प्रकरण हे सन २००८ सालचे असुन प्रतिवादी यांचे पुराव्याकरीता ब-याच काळापासुन प्रलंबित आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांचेमुळे झालेला विलंब व त्यामुळे वादी यांचे झालेले नुकसान याकरीता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य वाटत आहे. त्यामुळे, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:आदेश :-**

**०१.** अर्ज रक्कम रु. २,०००/- (रुपये दोन हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

**०२.** खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी. तसे न झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RATHOD SUJIT
Date: 2024.08.05 17:26:42 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०३/०८/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 03/08/2024 |
| Order signed by P.O. on | 03/08/2024 |
| Order uploaded on | 05/08/2024 |